**महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ**

मध्यवर्ती कार्यालय : हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन,
सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई - ४०० ०१३
दूरध्वनी - ०२२-४३२२६८०८/८१२ ई मेल – mlwbcivil@gmail.com

---

जा.क्र.मका/बांधकाम/२०२२/१५६

दिनांक : ३०/०६/२०२२

## जाहीर प्रकटन

विषय - मुंबई शहर व परिसरातील महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या इमारतींच्या देखभाल दुरुस्ती कामांबाबत. - वास्तुविशारद नियुक्त करणेबाबत.

संदर्भ - शासन पत्र क्र.मकाक ०२/प्र.क्र.३९/कामगार-१० दि.२२ जून २०२२

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळास खालील नमूद इमारतींची देखभाल दुरुस्ती कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत ठेकेदारांकडून राज्य दरसूची (एस.एस.आर) नुसार करुन घ्यावयाची आहेत. त्यासाठी आवश्यक दरपत्रक / निविदा कागदपत्रे तयार करणे, कामांवर देखरेख ठेवणे व कामांची देयके प्रमाणित करणे यासाठी नोंदणीकृत वास्तुविशारद यांचेकडून दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

**<u>दुरुस्ती करावयाच्या इमारतींची नावे –</u>**

१) कामगार कल्याण केंद्र, टिळकनगर, मुंबई
२) कामगार कल्याण केंद्र, गायकवाड नगर, मालाड, मुंबई
३) कामगार कल्याण केंद्र, सानेगुरुजी वसाहत, मालवणी मालाड, मुंबई
४) कामगार कल्याण भवन, आनंदनगर, ठाणे
५) कामगार कल्याण केंद्र, जुनी धारावी, मुंबई
६) ललित कला भवन, सानेगुरुजी पथ, मुंबई

वास्तुविशारद यांनी वरील नमूद इमारतींची / जागांची पाहणी करुन कामाचा आवाका लक्षात घ्यावा व त्यानंतर दरपत्रक सादर करावे. महाराष्ट्र शासनाचे सर्व अनुषंगिक अधिनियम/नियम/निकष यांच्या अधीन राहून दुरुस्ती कामे करुन घेण्याची जवाबदारी वास्तुविशारद यांची राहील. दरपत्रकासोबत जीएसटी क्रमांक व इतर आवश्यक

कागदपत्रे जोडावीत. मंडळाच्या मध्यवर्ती कार्यालय, प्रभादेवी, मुंबई येथे दिनांक ०८/०७/२०२२ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत बंद लिफाफ्यात दरपत्रक सादर करावेत. सदर दरपत्रक दिनांक ०८/०७/२०२२ रोजी दुपारी ३ वाजता उघडण्यात येतील. कोणतेही दरपत्रक स्विकारण्याचा अथवा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मंडळ प्रशासनास राहील.

(रविराज इळवे)

कल्याण आयुक्त